**पोलिस स्मृतिदिन** • परेडने तीन वेळा बंदुकीच्या तीन फैरी झाडल्यानंतर बिगुलर्सने 'लास्ट पोस्ट' आणि 'राऊज' वाजवला

# २९२ पोलिस अधिकारी, जवानांना श्रद्धांजली



पोलिस स्मृतिदिनानिमित्त वाहतूक शाखेच्या परिसरातील हुतात्मा स्मारकाजवळ तीन वेळा बंदुकीच्या तीन फैरी झाडताना पोलिस कर्मचारी.



स्मारकाला मानवंदना देताना डॉ. अविनाश ढाकणे, डॉ.उगले, भाग्यश्री नवटके.

प्रतिनिधी | जळगाव

आपले कर्तव्य बजावत असताना १ सप्टेंबर २०१८ ते ३१ ऑगस्ट २०१९ या कालावधीत निमलष्करी दलातील अधिकारी, जवान तसेच पोलिस दलातील अधिकारी व कर्मचारी धारातीर्थी पडले, अशा शुरांना सोमवारी पोलिस स्मृतिदिनानिमित्त वाहतूक शाखेच्या परिसरातील हुतात्मा स्मारकाजवळ श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या वेळी जिल्हाधिकारी डॉ.अविनाश ढाकणे उपस्थित होते.

२१ ऑक्टोबर १९५९ रोजी जीवघेण्या थंडीत हिमालयाच्या बर्फाळप्रदेशातील लद्दाख येथील 'हॉट स्प्रिंग' या सरहद्दीवर सीआरपीएफचे जवान गस्त घालीत असताना अचानक चिनी फौजांनी हल्ला केला. तो हल्ला परतावून लावताना जवानांनी धैर्याने व प्राणपणाने लढा दिला. या लढाईत १० जवान शहीद झाले. त्या शूर व कर्तव्यनिष्ठ जवानांच्या असीम त्याग प्रीत्यर्थ संपूर्ण भारतामध्ये २१ ऑक्टोबर हा दिवस 'पोलिस स्मृतिदिन' म्हणून पाळला जातो. तसेच १ सप्टेंबर २०१८ ते ३१ ऑगस्ट २०१९ या कालावधीत संपूर्ण भारतात एकूण २९२ पोलिस अधिकारी, पोलिस जवान कर्तव्य बजावताना शहीद झाले. यात महाराष्ट्रातील ३ पोलिस जवानांनी प्राणाची आहुती दिली आहे. या सर्व शुरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या वेळी पोलिस अधीक्षक डॉ.पंजाबराव उगले, अपर पोलिस अधीक्षक भाग्यश्री नवटके, पोलिस उपअधीक्षक संजय देशमुख, पोलिस निरीक्षक राजेशसिंह चंदेल, कार्यालय अधीक्षक विलास पवार, पोलिस निरीक्षक पंकज पवार, सुभाष कावरे, गोरख शिरसाठ, मदन चव्हाण, भरत चौधरी आदी अधिकारी व कर्मचारी तसेच जळगाव शहरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. पोलिस स्मृतिदिन संचलनाचे मिलिंद केदार यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी महेश केदारे, हर्षल बयास, जयंत चौधरी आदींनी सहकार्य केले.

## जळगाव जिल्ह्यातील या शहिदांचे स्मरण

कार्यक्रमास जळगाव जिल्ह्यातील यापूर्वी शहीद पोलिस अधिकारी, कर्मचारी सहायक पोलिस निरीक्षक एम. बी. साने, पोलिस उपनिरीक्षक महेंद्रसिंग पाटील, सीताराम चौधरी, पोलिस कॉन्स्टेबल राजेंद्र अवस्थी, अर्जुन नेरकर, अनिलसिंग बयास, जी.सादीक मोहम्मद, भगवान पाटील, पी. व्ही. जाधव यांचे नातेवाईक देखील या वेळी उपस्थित होते.

## शहिदांना कर्मचाऱ्यांनी दिली मानवंदना

प्रमुख पाहुणे डॉ. अविनाश ढाकणे, डॉ.पंजाबराव उगले, भाग्यश्री नवटके यांनी शहीद कुटुंबीयांची भेट घेतली. या नंतर शोक संदेशाचे वाचन सहाय्यक पोलिस निरीक्षक नीता कायटे यांनी केले. डॉ. ढाकणे, डॉ. उगले, नवटके यांनी पुष्पचक्र वाहिले. परेडने जनरल सॅल्यूट देऊन मानवंदना दिली. परेडने तीन वेळा बंदुकीच्या तीन फैरी झाडण्यात आल्या. नंतर बिगुलर्सने वाजवण्यात आला.

# पोलीस दलातर्फे पोलीस स्मृतीदिनी संचलन ; शहिदांना दिली मानवंदना

## जिल्ह्यातील नऊ शहीद पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश

**जळगाव । प्रतिनिधी**







जिल्हा पोलीस दलातर्फे पोलीस स्मृतीदिनानिमित्त संचलन कार्यक्रम सोमवारी सकाळी पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळील हुत्मामा स्मारकाजवळ जिल्हाधिकारी डॉ. अविनाश ढाकणे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. बंदुकीच्या तीन फैरी झाडून शहिदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

१ सप्टेंबर २०१८ ते ३१ ऑगस्ट २०१९ या कालावधीत आपले कर्तव्य बजावित असताना निमलष्करी व पोलीस दलातील जे अधिकारी व कर्मचारी धारातीर्थी पडले, अशा शूर अधिकारी व जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

### देशासाठी जवानांचा त्याग

या पवित्र दिनाचा इतिहास असा आहे की, २१ ऑक्टोंबर १९५९ रोजी जीवघेण्या थंडीत हिमालयाच्या बर्फाळ प्रदेशातील लडाख येथील हॉट स्प्रींग या सरहद्दीवर सी.आर.पी.एफ.चे जवान गस्त घालीत असताना अचानक चिनी फौजांनी १० सी.आर.पी.एफ.च्या जवानांवर हल्ला केला. तो हल्ला परतावून लावताना जवानांनी धैर्याने व प्राणपणाने लढा दिला. या लढाईत १० जवान शहीद झाले.त्या शूर व कर्तव्यनिष्ठ जवानांच्या असीम त्यागाप्रित्यर्थ संपूर्ण भारतामध्ये २१ ऑक्टोंबर हा दिवस पोलीस स्मृतीदिन म्हणून पाळला जातो.१ सप्टेंबर २०१८ ते ३१ ऑगस्ट २०१९ या कालावधीत संपूर्ण भारतात एकूण २९२ पोलीस अधिकारी व पोलीस जवान कर्तव्य बजावताना शहीद झाले. त्यात महाराष्ट्रातील तीन पोलीस जवानांनी प्राणाची आहुती दिली आहे.

याप्रसंगी पोलीस अधीक्षक डॉ.पंजाबराव उगले, अप्पर पोलीस अधीक्षक भाग्यश्री नवटके, संजय देशमुख, पोलीस निरीक्षक राजेशसिंह चंदेल, कार्यालय अधीक्षकविलास पवार, निरीक्षक पंकज पवार, सुभाष कावरे, गोरख शिरसाठ, मदन चव्हाण, भरत चौधरी, तसेच शहरातील अनेक नागरिक उपस्थित होते.

### शहिदांच्या कार्याची माहिती

अधिकाऱ्यांनी शहीद कुटुंबीयांची भेट घेतली. नंतर शोक संदेशाचे वाचन केले. वीरगती प्राप्त झालेल्या अधिकारी व कर्मचारी नावे सहाय्यक पोलीस निरीक्षक नीता कायटे यांनी वाचन केले. अधिकाऱ्यांनी पुष्पचक्र वाहिले. परेडने जनरल सॅल्यूट दिला. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मानवंदना दिली. परेडने तीन वेळा बंदुकीच्या तीन फैरी झाडण्यात आल्या. परेडने जनरल सॅल्यूट दिला. जिल्ह्यात शहीद झालेले पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांची माहिती देण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक एम.बी.साने, उपनिरीक्षक महेंद्रसिंग कुमारसिंग पाटील, सीताराम पुंजाजी चौधरी, कॉ. राजेंद्र बाबू अवस्थी, अर्जुन राघो नेरकर, अनिलसिंग मगनसिंग बयास, जी.सादीक मोहम्मद, भगवान सखाराम पाटील, सहाय्यक फौजदार पी.व्ही.जाधव यांच्या कार्याची माहिती देण्यात आली.



या वेळी शहिदांचे नातेवाईक सेवानिवृत्त सहायक पोलीस आयुक्त घ.क.पाटील, प्रमिलाबाई भगवान पाटील, हर्षल अनिलसिंग बयास, अनिता अनिलसिंग बयास, रेखा राजेंद्र अवस्थी, निवेदिता सुनील ताठे, विजया अर्जुन नेरकर, गीताबाई सीताराम चौधरी, विमल सुरेश चौधरी, ओम सुशिल चौधरी, सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक छ. इ.पाटील उपस्थित होते. संचलनाचे सुत्रसंचालन सहाय्यक फाजदार मिलींद केदार यांनी केल. यशस्विते निरीक्षक सुभाष कावरे, उपनिरीक्षक गोरख शिरसाठ, मदन चव्हाण, भरत चौधरी, लिपिक महेश केदारे, हर्षल बयास, जयंत चौधरी यांनी परिश्रम घेतले.